गुढीपाडवा : नवचैतन्य, स्वाभिमान - नवसंस्कृतीचा उत्सव >> पान 2

मोठा खुलासा! इस्रायली हल्ल्यात इराणच्या दुसऱ्या सर्वोच्च नेत्याचा मृत्यू; मुलगाही ठार >> पान 3

CRF अंतर्गत जिल्ह्यात रस्ते निर्मितीसाठी निधी द्या >> पान 4

**सुविचार**

ते सोपे आहे माझ्या मित्रा: कारण राजकारण हे भौतिकशास्त्रापेक्षा अवघड आहे. – अल्बर्ट आइनस्टाइन


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 219 ■ गुरूवार, दि. 19 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





## अजित पवार विमान अपघात प्रकरण: CBI चौकशीसाठी फडणवीसांचे अमित शहांना पत्र, रोहित पवारांच्या मागणीची प्रतही जोडली

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईहून बारामतीकडे येणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा बारामती विमानतळाच्या धावपट्टीवर उतरताना भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत अजित पवारांसह पाच जणांचा दुर्दैवी अंत झाला. या अपघाताबाबत आमदार रोहित पवार यांनी संशय व्यक्त करत राज्य सरकारने सीबीआय चौकशीसाठी केंद्राला अद्याप पत्र दिले नसल्याचा गंभीर आरोप केला होता. मात्र आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना सीबीआय चौकशीच्या मागणीसाठी लिहिलेले अधिकृत पत्र समोर आले असून, यामुळे या प्रकरणाला आणि राजकीय चर्चांना मोठी कलाटणी मिळाली आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या सीबीआय चौकशीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मार्च रोजीच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना अधिकृत पत्र पाठवले असल्याचे समोर आले आहे. या पत्रात त्यांनी आमदार रोहित पवार यांच्या मागणीचा विशेष उल्लेख केला असून, त्यांच्या पत्राची प्रतही देवेंद्र फडणवीस यांनी सोबत जोडली आहे. रोहित पवारांनी केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर, फडणवीसांचे हे पत्र उघड झाल्यामुळे आता या प्रकरणाला एक नवे वळण मिळाले आहे.

दरम्यान, मंगळवारी आमदार रोहित पवार यांनी आपल्याकडे अपघात संदर्भात मोठी माहिती असल्याचे सांगितले होते. तसेच सरकारने काही पाऊल उचलले नाही तर माहिती समोर आणू, असा इशाराही त्यांनी दिला होता. रोहित पवार म्हणाले की, अपघात संदर्भातील मोठी माहिती माझ्याकडे आहे. अगदी काही माहिती आम्ही



आत्ता समोर आणली आहे. सरकार काय पाऊल उचलते हे बघू नाहीतर ती मोठी माहिती समोर आणू, असा इशारा पवारांनी दिला. अजित पवार यांच्या सोबत सत्तेत असणारे किती स्मरण पत्र देणार, सत्तेत असून तुम्ही आपल्या माणसाला न्याय देऊ शकत नाही तुम्ही इतरांना काय न्याय देणार? असा सवालही त्यांनी उपस्थित केला होता.

पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी हे सुद्धा अजित पवार यांच्या विमान अपघाता संदर्भात चर्चा व्हावी, यासाठी प्रयत्न करत आहेत. पण चर्चा होऊ द्यायची नाही असे दिसत आहे. VSR कंपनीला वाचवले जात आहे, याच्या मागे कोणीतरी मोठा माणूस असल्याची शंका पवारांनी व्यक्त केली आहे.

## महाराष्ट्रधर्म वाढवुया मराठीची गुढी उंच उभी करुया..!; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून गुढी पाडव्याच्या शुभेच्छा




**मुंबई/प्रतिनिधी :** 'महाराष्ट्रधर्म वाढवुया मराठीची गुढी उंच उभी करुया..' या आकांक्षेसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी नववर्ष प्रारंभ अर्थात गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

नववर्षाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या या संदेशात म्हटले आहे की,' नववर्ष आपल्या सर्वांसाठी सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो. सर्वांच्या आशा-आकांक्षा आणि मनोकामना पूर्ण करणारे ठरावे. नवसंकल्पना साकार व्हाव्यात यासाठी ऊर्जा देणारे ठरावे त्यासाठी सर्वांना निरामय आरोग्य लाभो, हीच प्रार्थना. यातून लाभणाऱ्या नवचैतन्यातून महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा मराठीची गुढी आणखी उंच उभी करण्याचा निर्धार करुया !'

## सांगोला विद्यामंदिर प्रशालेमध्ये घडलेला पेपर चोरीचा गुन्हा उघड शालेय शिक्षण विभागाचे स्पष्टीकरण

**मुंबई/प्रतिनिधी :** सोलापूर जिल्ह्यातील सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील कस्टडी रुममध्ये ठेवलेले इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेचे पेपर १७ मार्च २०२६ रोजी अज्ञात इसमाने चोरुन नेल्याबाबत सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा एका अल्पवयीन विधि संघर्षग्रस्त बालकाने केल्याचे उघड झाले असल्याचे सांगोला पोलिसांकडून कळविण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

या अनुषंगाने सांगोला पोलीस ठाण्याकडून करण्यात आलेल्या तपासानुसार हा गुन्हा एका अल्पवयीन विधि संघर्ष ग्रस्त बालकाने केल्याचे उघड झाले आहे. त्याने गुन्हा केल्याबाबत कबुली दिलेली असून गुन्हा करताना वापरलेले इलेक्ट्रिक कटर, इलेक्ट्रिक मोटार सायकल, चोरीस गेलेले इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेच्या प्रश्न पत्रिका व तीन कोऱ्या उत्तर पत्रिका जप्त करण्यात आल्या असल्याची माहिती सांगोला पोलीसांकडून देण्यात आल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

## प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींच्या गैरव्यवहाराची दोन महिन्यांत चौकशी होणार- राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांचे आश्वासन

**मुंबई/प्रतिनिधी :** नंदूरबार जिल्ह्यातील नर्मदा बचाव आंदोलनातील सक्रिय कार्यकर्त्यांने शासनाकडून आर्थिक मोबदला व पुनर्वसनाचा लाभ घेतला असलेल्या प्रकरणाची पुढील दोन महिन्यात सखोल चौकशी करण्यात येईल, अशी माहिती राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य आमश्या पाडवी यांनी याविषयीसंदर्भात विधानसभेत लक्षवेधी उपस्थित केली होती.

राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल म्हणाले की, नर्मदा बचाव आंदोलनातील प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत शासनाने शासन निर्णय ४ फेब्रुवारी २००४ व २० सप्टेंबर २००४ नुसार कार्यवाही केलेली आहे. नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील गमन येथील हुन्या रूपा वसावे यांच्यासंदर्भात सविस्तर तक्रार दाखल करावी त्याची चौकशी दोन महिन्यात करण्यात येईल असे त्यांनी यावेळी नमूद केले.

## अमेरिकेकडून होर्मुज सामुद्रधुनीजवळील इराणी भागात ५,००० पौंडांचा बॉम्ब हल्ला

वॉशिंग्टन : अमेरिकेने बुधवारी पहाटे इराणवर अनेक मोठे हल्ले केले आहेत. अमेरिकन सैन्याने सांगितले की या हल्ल्यांमध्ये ५,००० पाउंड (सुमारे २,२६७ किलोग्रॅम) वजनाचे डीप पेनेट्रेटर बॉम्ब वापरण्यात आले. अमेरिकन सेंट्रल कमांडच्या माहितीनुसार, या कारवाईत होर्मुज सामुद्रधुनीजवळील इराणच्या किनारी भागांमध्ये असलेल्या कडेकोट सुरक्षा असलेल्या क्षेपणास्त्र तळांना लक्ष्य करण्यात आले. अमेरिकन सैन्याच्या निवेदनात म्हटले आहे की या तळांवर तैनात अँटी-शिप क्रूझ क्षेपणास्त्रे आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीसाठी धोका ठरत होती, त्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

दरम्यान, इराणने इस्रायलच्या मध्य भागावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्र हल्ले केले असून त्यात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. इस्रायलची आपत्कालीन सेवा मॅगन डेविड अडोम (एमडीए) यांच्या माहितीनुसार, रमत गन शहरात एका पुरुष आणि एका महिलेचा गंभीर शेलच्या तुकड्यांमुळे मृत्यू झाला. तसेच तेल अवीवच्या उत्तरेला असलेल्या बेनी ब्राक शहरात क्षेपणास्त्राचे तुकडे पडल्यामुळे एक व्यक्ती जखमी झाला आहे. दुसरीकडे, संयुक्त अरब अमिरातीमध्येही इराणकडून क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले झाल्याची पुष्टी करण्यात आली आहे.

संयुक्त अरब अमिरातीच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की देशातील विविध भागांमध्ये हवाई संरक्षण प्रणालींनी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे अडवली असून लढाऊ विमानांनी इराणी ड्रोन पाडले. राष्ट्रीय आपत्कालीन संकट व आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरिकांना सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आणि अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. संपूर्ण देशात सायरन वाजल्याचे ऐकू आले असून ते यशस्वी इंटरसेप्शन कारवाईचे परिणाम असल्याचे सांगण्यात आले.

बहरेनच्या गृह मंत्रालयानेही सायरन वाजल्याची पुष्टी करत नागरिक आणि रहिवाशांना शांत राहून सुरक्षित स्थळी जाण्याचे आवाहन केले. कुवैतमध्येही सैन्याने सांगितले की त्यांच्या हवाई संरक्षण प्रणाली शत्रूच्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांना प्रत्युत्तर देत आहेत आणि ऐकू आलेले स्फोटांचे आवाज हे इंटरसेप्शनमुळेच आहेत.दरम्यान, इस्रायलनेही इराणवर सातत्याने हवाई हल्ले सुरू ठेवले आहेत. मंगळवारी इस्रायली सैन्याच्या हल्ल्यांमध्ये इराणचे वरिष्ठ नेते अली लारीजानी आणि बसीज फोर्सचे कमांडर गुलामरेजा सुलेमानी यांचा मृत्यू झाला. तसेच इस्रायलने लेबनॉनची राजधानी बेरूत येथेही जोरदार हवाई हल्ले केले आहेत.

## भारताचे तिसरे तेलवाहू जहाज 'जग लाडकी' अखेर भारतात दाखल! इंधन संकट टळणार?



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य पूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. जग लाडकी हे भारतीय ध्वजाखालील तेलवाहू जहाज सुरक्षितपणे गुजरातमधील मुंद्रा बंदर येथे दाखल झाले आहे.

हे जहाज फुजैराह बंदर येथून १४ मार्च दरम्यान रवाना झाले होते आणि १८ मार्च रोजी भारतात पोहोचले. काही अहवालांनुसार जहाज दुपारी २:३० वाजता पोहोचण्याची अपेक्षा होती, मात्र ते सकाळी ६ वाजताच मुंद्रा बंदरात दाखल झाले.

या जहाजामध्ये तब्बल ८०,८०० मेट्रिक टन 'मुरबान' प्रकारचे कच्चे तेल आहे. मध्य पूर्वेतील तणावामुळे होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडताना धोका निर्माण झाला होता. विशेषतः इराण आणि यूएई यांच्यातील तणावामुळे या मार्गावरील जहाजवाहतुकीवर दबाव होता. तरीही जहाज आणि त्यावरील भारतीय नाविक सुरक्षित भारतात पोहोचले आहेत.

हे जहाज शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया चे असून 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' नंतर भारतात दाखल होणारे तिसरे महत्त्वाचे जहाज ठरले आहे. या कच्च्या तेलाच्या आगमनामुळे भारतातील इंधन पुरवठा स्थिर ठेवण्यास मदत होणार आहे. सध्या देशातील रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून, वाढत्या जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर हा पुरवठा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

## आदिवासी कलाकार, लेखक, पर्यावरण कार्यकर्ते यांना लोकभवन येथे घेऊन या - राज्यपाल वर्मा

### आदिवासी विकास मंत्री, आमदार व अधिकाऱ्यांची राज्यपालांशी चर्चा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ अशोक वुईके यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी क्षेत्रातील आमदार तसेच आदिवासी विकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बुधवारी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन मुंबई येथे भेट घेऊन आदिवासी विकासासंबंधी विविध विषयांवर चर्चा केली. राज्यातील आदिवासी कवी, लेखक, गायक, समाजसेवक व पर्यावरण कार्यकर्त्यांना लोकभवन येथे घेऊन यावे आपण त्यांच्याशी चर्चा करू, अशी सूचना राज्यपालांनी आदिवासी विकास मंत्र्यांना केली.

राज्याला प्रथमच आदिवासी समाजातील राज्यपाल लाभले आहे, त्यामुळे आदिवासी जनतेच्या समस्यांचे निराकरण होण्यास मदत मिळेल अशी भावना उपस्थित लोकप्रतिनिधींनी यावेळी व्यक्त केली.

देशाच्या विविध भागातील आदिवासींचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान मोठे असून अशा सर्व आदिवासी क्रांतिकारकांची माहिती देणाऱ्या लहान लहान पुस्तिका तयार कराव्यात, अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली.

राज्याच्या सांस्कृतिक विभागाच्या सहकार्याने आदिवासी क्रांतिकारकांच्या जीवन कार्याची माहिती देणारे लघु नाट्य व पथ नाट्य देखील तयार करावे तसेच या कार्यात आदिवासी गायक कलाकार, कवी यांना सहभागी करुन घ्यावे. या उपक्रमामुळे आदिवासींच्या योगदानाबद्दल व संस्कृतीबद्दल नव्या पिढीला अधिक माहिती होईल, असे राज्यपालांनी सांगितले.

महिला स्वयंसहायता गट हे महिला सक्षमीकरणाचे आंदोलन आहे असे सांगून राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आदिवासी विकास विभागाला राज्यातील आदिवासी विभागांमधील महिला स्वयंसहायता गटांची संख्या व त्यांचे कार्य याबाबत विस्तृत माहिती गोळा करून सादर करण्याची सूचना केली.

आदिवासी भागांमधील क्षयरोग निर्मूलनाची स्थिती तसेच आदिवासी महिलांमधील ॲनिमिया या विषयाची देखील माहिती सादर करण्याच्या सूचना केल्या.

बैठकीला आमदार हरिश्चंद्र भोये, राजेश पडवी, भीमराव केराम, केवलराम कावे, राजू तोडसाम व माजी मंत्री राजेंद्र गावित उपस्थित होते.

यावेळी आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड व आदिवासी



विकास संशोधन परिषदेच्या आयुक्त मंजिरी मनोलकर यांनी राज्यपालांसमोर आपापल्या विभागांचे सादरीकरण केले.



# गुढीपाडवा : नवचैतन्य, स्वाभिमान - नवसंस्कृतीचा उत्सव

भारतीय संस्कृतीत सण-उत्सव हे केवळ आनंदाचे क्षण नसतात; ते समाजाच्या इतिहासाचे, परंपरेचे आणि सामूहिक भावनांचे प्रतीक असतात. प्रत्येक सणामागे एखादी प्रेरणा, एखादा ऐतिहासिक संदर्भ आणि जीवनाला दिशा देणारा संदेश दडलेला असतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेला सण म्हणजे गुडीपाड़वा. हा दिवस केवळ नवीन वर्षाचा प्रारंभ नाही, तर नवचैतन्य, नवउमेद आणि नव्या आशेचा आरंभ आहे. वसंत ऋतूच्या आगमनासोबत येणारा गुढीपाडवा हा सण भारतीय संस्कृतीच्या जीवनदायी परंपरेचे प्रतीक आहे. निसर्गात जशी नवपालवी फुटते, तशीच नव्या वर्षाची सुरुवात जीवनात नवीन संधी, नवीन विचार आणि नवीन ऊर्जा घेऊन येते. म्हणूनच गुढीपाडवा हा केवळ धार्मिक सण नाही; तो आशावाद, पुनरुत्थान आणि सकारात्मकतेचा उत्सव आहे.

भारतीय पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला नवीन वर्षाची सुरुवात होते. याच दिवशी महाराष्ट्रात गुढीपाडवा साजरा केला जातो. हा दिवस उगड़ी म्हणून आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात साजरा होतो, तर उत्तर भारतात याच काळात चैत्र नवरात्री सुरू होते. यातून भारतीय संस्कृतीची एक महत्त्वाची वैशिष्ट्य दिसते, भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेतूनही एकात्मतेची भावना. भारताच्या विविध भागात नाव वेगवेगळी असली तरी नववर्षाचे स्वागत करण्यामागची भावना एकच आहे नवीन सुरुवात, नव्या आशा आणि नव्या शक्यता. गुढीपाडव्याच्या दिवशी घराच्या प्रवेशद्वारावर उभारली जाणारी गुढी ही विजय, समृद्धी आणि स्वाभिमानाचे प्रतीक मानली जाते. बांबूच्या काठीवर रेशमी वस्त्र, साखरेची गाठी, कडुलिंबाची पाने आणि वर तांब्याचा किंवा चांदीचा कलश लावून गुढी उभारली जाते. ही गुढी केवळ धार्मिक परंपरा नाही; ती विजयाचा आणि सकारात्मकतेचा ध्वज आहे. घराच्या दाराशी उभारलेली गुढी जणू सांगत असते, अडचणी कितीही असल्या तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा.

गुढीपाडव्याशी अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ जोडलेले आहेत. काही परंपरांनुसार हा दिवस इतिहासकारांच्या मते शिवाजी यांच्या विजयाचे प्रतीक म्हणूनही गुढी उभारली जाते. या संदर्भांचा अर्थ इतकाच गुढी म्हणजे विजयाचा ध्वज. अन्याय, पराभव किंवा संकटावर मात करून उभे राहण्याची प्रेरणा या सणातून मिळते. गुढीपाडवा हा सण निसर्गाशीही अतूटपणे जोडलेला आहे. चैत्र महिन्यात निसर्गात नव्या पालवीचे आगमन होते.



झाडांना नवी पाने फुटतात, फुलांचा सुगंध दरवळतो, वातावरणात ताजेपणा भरतो. हा निसर्गाचा संदेश आहे, जीवनात कितीही कठीण काळ आला तरी नव्या सुरुवातीची संधी नेहमी असते. म्हणूनच गुढीपाडवा हा निसर्गाशी एकरूप होऊन नव्या जीवनाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. सण हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम असतात. गुढीपाडव्याच्या दिवशी लोक एकमेकांना भेटतात, शुभेच्छा देतात, आनंद वाटून घेतात.

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणसांमधील संवाद कमी होत चालला आहे. तंत्रज्ञानाने अंतर कमी केले असले तरी मनांमधील दुरावा वाढत आहे. अशा वेळी गुढीपाडवा आपल्याला स्मरण करून देतो, समाजाचा खरा आधार म्हणजे परस्परांचे नाते आणि विश्वास. आजचा काळ वेगवान बदलांचा आहे. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि जीवनशैली झपाट्याने बदलत आहे. या बदलांच्या प्रवाहात अनेकदा आपली सांस्कृतिक परंपरा मागे पडताना दिसते. सण-उत्सव अनेकदा केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहतात. परंपरेचा अर्थ न समजता केवळ विधी पार पाडले जातात. मात्र गुढीपाडवा आपल्याला सांगतो, सण साजरा करण्याचा खरा अर्थ म्हणजे जीवनात सकारात्मकता, मूल्ये आणि सांस्कृतिक अभिमान जपणे. गुढीपाडवा म्हणजे केवळ शुभेच्छा देण्याचा दिवस नाही; तो नवीन संकल्प करण्याचा दिवस आहे. समाज म्हणून आपण स्वतःला प्रश्न विचारायला हवा, आपण अधिक संवेदनशील समाज घडवत आहोत का? आपण सामाजिक समतेच्या दिशेने पावले टाकत आहोत का? आपण पर्यावरणाचे रक्षण करत आहोत का? नवीन वर्षाचा खरा अर्थ म्हणजे केवळ कालगणनेचा बदल नाही, तर विचारांचा आणि कृतीचा बदल. जागतिकीकरणाच्या या युगात अनेक संस्कृती एकमेकांशी मिसळत आहेत. हे सकारात्मक असले तरी आपल्या संस्कृतीची ओळख जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गुढीपाडवा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सण आहे. या सणातून आपली परंपरा, आपले मूल्य आणि आपली सांस्कृतिक ओळख जपली जाते. गुढीपाडवा हा सण आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो, जीवनात कितीही संकटे आली तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा. गुढी म्हणजे विजयाचे प्रतीक, नववर्ष म्हणजे नव्या संधींचा प्रारंभ आणि हा सण म्हणजे जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा.

आजच्या बदलत्या काळात गुढीपाडव्याचा खरा अर्थ समजून घेतला तर हा सण केवळ परंपरा राहणार नाही; तो समाजाला दिशा देणारा प्रेरणादायी उत्सव ठरेल. नवीन वर्ष आपल्यासाठी प्रगती, समता, आनंद आणि समृद्धी घेऊन येवो, समाजात बंधुभाव वाढो आणि प्रत्येकाच्या आयुष्यात नवचैतन्य फुलो, हीच या मंगल दिनी अपेक्षा. गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**प्रविण बागडे**
नागपूर भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

## धर्मांतराच्या प्रकारांना नक्कीच चाप बसेल

हिंदू नववर्षाच्या आधी महाराष्ट्राने धर्मांतरविरोधी कायदा करून राज्यातील हिंदू जनतेला सुरक्षा प्रदान केली आहे, त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचे सर्वप्रथम अभिनंदन! गेल्या काही महिन्यांतच धर्मांतरविरोधी कायदे अनेक राज्यांमध्ये पारित झाले. महाराष्ट्रात त्याची भासणारी उणीव आता दूर झाली आहे. 'धर्मो रक्षति रक्षितः' असे सुभाषित असून, राज्यातील हिंदूंचे सक्तीने वा फसवून होणारे धर्मांतर रोखण्यात सरकारने आपली जबाबदारी पार पाडली आहे. महाराष्ट्र विधानसभेने राज्यात 'धर्मस्वातंत्र्य विधेयक' संमत करून हिंदू धर्माच्या रक्षणाचे एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. हे विधेयक सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक कोणत्याही एका धर्माविरोधात नसल्याचे स्पष्ट केले. याआधी देशातील ओडिशा, कर्नाटक, हरियाणा, राजस्थान, अरुणाचल प्रदेश वगैरे १२ राज्यांमध्ये अशाप्रकारचे कायदे गेल्या काही वर्षांत करण्यात आले आहेत. राज्यातील धर्मांतराच्या प्रकरणांबाबत स्पष्टता यावी आणि आमिष दाखवून, बळजबरीने किंवा धाक-दपटशाहीने कोणतेही धर्मांतर घडू नये, यासाठी हा कायदा आवश्यक होता, असे ते म्हणाले. गेल्या काही वर्षांत देशात 'लव्ह जिहाद'च्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत होत्या. तसेच राज्यातील आदिवासी वस्त्यांमध्येही धर्मांतराची प्रकरणे वाढीस लागली होती. हे विधेयक कोणत्याही एका धर्माच्या विरोधात नसले, तरी फसवून किंवा आमिष दाखवून होत असलेल्या धर्मांतराच्या प्रकारांना यामुळे नक्कीच चाप बसेल. देशाच्या अनेक राज्यांमध्ये लोकसंख्येचे स्वरूप बदलण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू आहेत. सीमावर्ती राज्यांमध्ये त्याचे प्रमाण आणि वेग अधिक असला, तरी अन्य राज्यांमध्येही हे प्रकार घडत आहेत. महाराष्ट्रात मालेगाव, जळगाव, अकोला, तसेच मुंबईजवळ मिरा-भाईंदर वगैरे भागांमध्ये आणि अगदी मुंबई शहरातही स्थानिक लोकसंख्येचे स्वरूप बदलण्याचे पद्धतशीर कारस्थान सुरू आहे. यात प्रामुख्याने तरुण मुली आणि महिलावर्गाला लक्ष्य केले जात आहे. 'लव्ह जिहाद'च्या माध्यमातून तरुण मुलींना फसवून त्यांचे धर्मांतर केले जाते. काही काळानंतर या मुलींना वाऱ्यावर सोडले जाते किंवा कधीकधी ठारही मारले जाते. अशा प्रकारांनाही या कायद्यामुळे आळा बसेल. अशाप्रकारे फसवणुकीतून किंवा बेकायदेशीर प्रकारे केलेल्या विवाहातून जन्माला आलेल्या मुलांचा धर्म त्यांच्या आईचा मूळ धर्म मानला जाईल, अशी तरतूददेखील या कायद्यात केली आहे, ही महत्त्वाची बाब. कारण, धर्मांतराच्या अशा घटनांचा खरा उद्देश आपल्या धर्माची लोकसंख्या वाढविण्यासाठी अनेक मुलांना जन्माला घालणे हा असतो. त्याला या तरतुदीमुळे चांगलाच आळा बसेल. अर्थातच, ज्याला स्वखुशीने आणि प्रामाणिकपणे धर्मांतर करायचे आहे, त्याला त्याची मुभा आहे. त्यासाठी अशा व्यक्तीला जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे ६० दिवस आधी सूचना द्यावी लागेल. त्यामुळे धर्मांतराची ही प्रक्रिया पारदर्शक होईल आणि ती स्वेच्छेने घडत आहे, हे निश्चित करता येईल. या कायद्यानुसार, दोषी आढळलेल्या व्यक्तीला सात-दहा वर्षांच्या तुरुंगवासाची आणि पाच ते सात लाख रुपये दंडाची तरतूद केली आहे. हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र असल्याने पोलीसही तातडीने कारवाई करू शकतात. शिवाय, ते स्वतःहून (सुओ मोटू) अशा घटनांसंदर्भात गुन्हा दाखल करू शकतात. मुळात अशा कायद्यांची गरज काय, असा प्रश्न विचारणाऱ्यांनी अगदी अलीकडेच घडलेल्या एका घटनेची दखल घ्यावी. २०१९ मध्ये 'मिस इंडिया अर्थ' राहिलेली सायली सुर्वे हिने त्या साली एका मुस्लीम युवकाशी लग्न केले. त्यानंतर तिला सक्तीने धर्मांतर करण्यास भाग पाडण्यात आले. शिवाय, गेल्या आठ वर्षांत तिला चार अपत्यांना जन्म द्यावा लागला. सासरी अपेक्षेप्रमाणे आत्मसन्मान आणि प्रेम न मिळाल्याने आणि छळ सहन करावा लागल्याने तिने नुकतेच पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश केला. तिने स्वतःच आपली विदारक कहाणी पत्रकारांसमोर मांडली होती. ही केवळ एक घटना आहे. पण, प्रसिद्धीच्या प्रकाशात न आलेल्या अशा शेकडो घटना घडत असतात. त्यात प्रामुख्याने बळी जातो तो महिलांचा! त्यामुळे हे विधेयक म्हणजे महिलांच्या संरक्षणासाठी आणखी एक पाऊल म्हणावे लागेल. या विधेयकाला महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), समाजवादी पार्टी व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांनी अपेक्षेप्रमाणे विरोध करून आपापल्या मतपेढीला चुचकारले आहे. आश्चर्य म्हणजे शिवसेना (उबाठा गट) पक्षाने मात्र या विधेयकाला पाठिंबा दिला, ही स्वागतार्ह बाब मानली पाहिजे. या पक्षाने निदान एकतरी निर्णय योग्य घेतला, असे म्हणावे लागेल. अर्थात, त्यांनी पाठिंबा दिल्याने त्यांच्या पक्षाची 'मुस्लीम लांगूलचालनवादी पक्ष' ही प्रतिमा सुधारणार नाही आणि तसा त्यांचा प्रयत्नही नसावा. पण, या विधेयकाला विरोध केला असता, तर उद्धव ठाकरे यांचा पक्ष थेट 'मुस्लीमवादी' ठरला असता. आता राज्यातील सर्व स्तरांवरील निवडणुकांमध्ये मोठी हार पत्करावी लागल्याने पक्षाला जनमानसात थोडेतरी स्थान शिल्लक राहावे, यासाठी त्यांनी कदाचित या विधेयकाला पाठिंबा दिला असावा. या विधेयकावर विरोधकांनी नाहक गदारोळ माजविण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड त्यात प्रमुख होते. अर्थात, त्यांच्या मुंब्रा या मतदारसंघात त्यांची सद्दी संपुष्टात आल्याने त्यांना आपले अस्तित्व कायम राखण्यासाठी काही देखावा तर करावाच लागणार होता. तसा त्यांनी तो केला. तसेच अपेक्षेप्रमाणे काँग्रेसचे आमदार अस्लम शेख आणि समाजवादी पक्षाचे रईस शेख यांनीही या विधेयकाला आक्षेप घेतला. पण, त्यांच्या आक्षेपात जोश अधिक आणि तथ्य कमी असा प्रकार होता. हे विधेयक धार्मिकस्वातंत्र्यावर हल्ला आहे, हा नेहमीचा आरोप होता. पण, आंतरधर्मीय विवाहानंतर कधीकधी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवतो आणि त्यावेळी या कायद्यातील तरतुदींमुळे संबंधित व्यक्तीला संरक्षण देणे अधिक सोपे जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भारतात लोकशाहीची पाळेमुळे घट्ट रोवली गेली असली, तरी कायद्यात दिलेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोगच अधिक होताना दिसतो. हा दुरुपयोग सर्वाधिक प्रमाणात धार्मिकस्वातंत्र्याच्या घटनांमध्ये अधिक होतो. मुस्लिमांकडून कर्कश आवाजात 'अजान' लावणे, रस्त्यावर 'नमाज' पढून वाहतुकीची कोंडी करणे, धार्मिक मिरवणुकांवर निर्बंध आणणे यांसारख्या घटना घडत असत. धार्मिकस्वातंत्र्याच्या नावाखाली हिंदू सोडून अन्य धर्मियांना बेबंद सवलती दिल्या जात होत्या. पुढे काही हिंदुत्ववादी पक्षांनी उचललेल्या 'महाआरती'सारख्या उपायांनी रस्त्यावरील 'नमाज' बंद झाला आणि अलीकडच्या काळात ध्वनिप्रदूषणाविरोधातील उपायांमुळे 'अजान'चा आवाजही मंदावला. पण, या घटनांना कायद्याने पायबंद बसणे आवश्यक होते. आदिवासी वस्त्यांमध्ये तर उघडपणे आणि बेबंद पद्धतीने मोठ्या प्रमाणावर धर्मांतराचे प्रकार घडत होते. गेल्या काही वर्षांत तर 'लव्ह जिहाद'ने अनेक तरुण मुलींची आयुष्ये उद्ध्वस्त झाली होती. धार्मिकस्वातंत्र्याच्या नावाखाली चाललेल्या यासारख्या प्रकारांना आता या कायद्यामुळे मोठा चाप बसेल, हे निश्चित!

## पुनवट येथे होणाऱ्या शाळेच्या प्रस्तावाबाबत शासन सकारात्मक- महसूलमंत्री बावनकुळे

मुंबई/प्रतिनिधी : पुनवट (जि. यवतमाळ)येथील शाळेकरिता पाच एकर जागा पुरेशी आहे. यामुळे ग्रामपंचायतीची उरलेली जमीन गावाच्या इतर विकासासाठी शिल्लक राहील. याअनुषंगाने ग्रामपंचायतीने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत शासन सकारात्मक असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात उत्तर देताना सांगितले. आमदार संजय देरकर यांनी यवतमाळ जिल्ह्याच्या वणी तालुक्यातील मौजे पुनवट येथील डी.ए.व्ही शाळेकरिता जागेच्या मागणीसंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ही शाळा मायनिंग क्षेत्रात येत आहे. त्यामुळे शाळेसाठी जागा बदलून देण्यासाठीची मागणी ग्रामपंचायत व डब्ल्यू. सी. एल. ने केली होती. जिथे शासनाची जागा उपलब्ध आहे तिथे शाळा व्हावी असा प्रस्ताव शासनाकडे आहे. शाळेसाठी १५ एकर जागेची मागणी होत असली, तरी ७०० विद्यार्थ्यांसाठी पाच एकर जागा पुरेशी आणि प्रशस्त असून उर्वरित जागा ग्रामपंचायतकडेच राहिली तर तिचा वापर इतर सार्वजनिक कामांसाठी करता येईल. याबाबत डब्ल्यू. सी. एल. आणि खासगी संस्था यांच्यात करार होईल. ही शाळा त्याच भागात झाली पाहिजे या प्रस्तावाला शासनाची मान्यता असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# उष्माघात टाळा, आरोग्य सांभाळा; प्रतिबंधात्मक उपाययोजनाचे पालन करा

सध्या उन्हाळा सुरु झाला असून दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. भारतात हवामान खाते व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या निकषानुसार मैदानी भागात ४० डिग्री अंश सेल्सीअस, डोंगराळ भागात ३० डिग्री अंश सेल्सीअसपेक्षा व समुद्र किनारी भागात ३७ अंश डिग्रीपेक्षा जास्त तापमान जात असल्यास त्यास उष्मलाट प्रवण क्षेत्र मानले जाते. उष्मा-लहर ही वातावरणीय तापमानाची स्थिती आहे. ज्यामुळे शारीरिक ताण येतो, ज्यामुळे कधीकधी मानवी जीवनावर अतिशय विपरीत परिणाम होत असतो. कोणत्याही ठिकाणचे कमाल तापमान सलग दोन दिवस ४५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहिल्यास त्याला उष्मा लहरी स्थिती म्हणतात.

वाढत्या तापमानामुळे उन्हात फिरणाऱ्या व्यक्तीला उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घ्यावयाची काळजी, उपाययोजना याची माहिती या लेखाच्या माध्यमातून जाणून घेण्यात येत आहे.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये तापमानाचा पारा वाढत आहे. कडाक्याच्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा पुढील तीन महिने ४२ ते ४५ अंशांच्या घरात राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या शेतीची कामे सुरू असून शेतमजूर आणि शेतकरी उन्हाची पर्वा न करता शेतात राबतात. त्यामुळे त्यांना उष्माघाताचा फटका बसण्याची सर्वाधिक शक्यता असते. त्यामुळे उष्माघाताचा लोकांना त्रास होऊ नये, यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालयात स्वतंत्र उष्माघात कक्ष सुरू केले आहेत. उष्माघात कक्षात रुग्णांसाठी बेड, कुलर, थंड पाण्याची व्यवस्था, फॅन यासह औषधोपचारासाठी आवश्यक असलेली सर्व सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे.



**उष्माघाताची लक्षणे व घ्यावयाची काळजी**

उन्हाळा सुरु झाला की, उन्हात फिरल्यामुळे डोके दुखी, ताप, जास्त घाम येणे आणि बेशुद्ध पडणे, अशक्तपणा जाणवणे, शरीरात पेटके येणे, नाडी असामान्य होणे लक्षणे दिसून येतात. असे लक्षणे आढळल्यास व्यक्तीला सावलीच्या ठिकाणी झोपवा, त्रास झालेल्या मुला,मुलीला लगेच घरात किंवा सावलीत आणावे, संवेदनशील राहुन त्यांचे कपडे सैल किंवा ढिले करावेत, नळाच्या पाण्याने ओल्या केलेल्या पट्ट्या शरीरावर ठेवाव्यात, उलटी होत असल्यास त्यांना एका कुशीवर वळवावे. जेणेकरुन ते गुदमरुन जाणार नाहीत, हवा येण्यासाठी पंख्याचा वापर करावा, पायाखाली उशी किंवा तत्सम काही ठेवुन त्यांना आडवे पडायला सांगावे, वारंवार स्वच्छ आणि थंड पाण्याचे घोट पाजावेत, बेशुद्ध असल्यास त्यांना खायला किंवा प्यायला काहीही देण्याचा प्रयत्न करु नये.

**उष्माघाताची प्रौढांमध्ये दिसणारी लक्षणे**

शरीराचे तापमान १०४ फॅरन्हाईटपर्यत (४० डिग्री सेल्सीअस) पोहोचल्यास स्नायुंचे आखडणे, मळमळणे, उलटीचा भास होणे, चिंता वाटणे व चक्कर येणे हृद्याचे ठोके वाढणे, धडधडणे.

**उष्माघाताची लहान मुलांमध्ये लक्षणे**

आहार घेण्यास नकार देणे, नियीमत चिडचिड होणे, लघवीचे कमी झालेले प्रमाण, कुठूनही रक्तस्त्राव होणे, तोंडाच्या येथील त्वचा कोरडी होणे, शुष्क डोळे होणे.

**उष्णतेच्या लाटेदरम्यान काय करावे**

हलके खावे, फळे आणि सलाड सारखे पचायला हलके असणारे अन्न खावे, पुरेसे पाणी प्या, सैल, हलके, फिक्या रंगाचे आणि सुती कपडे परिधान करावेत. गॉगल, छत्री, टोपी, बुट, चप्पल घालूनच घराबाहेर पडावे. प्रवास करतांना पाण्याची बाटली आपल्याजवळ बाळगावी. थंड पाण्याने आंघोळ करावी. घराबाहेरील उपक्रम, मैदानी उपक्रमादरम्यान थोड्या-थोड्या वेळाने विश्रांती घ्यावी. विश्रांतीची वारंवारता वाढवावी.

उष्माघातापासुन बचावासाठी काय करावे : घराबाहेर जाण्यापुर्वी भरपुर पाणी प्यावे, सुती, सैल आणि आरामदायी कपडे घाला. भरपुर ताजे अन्न खाल्यानंतरच घरातुन बाहेर पडा. घराबाहेर जातांना डोके झाका किंवा छत्रीचा वापर करा. पाणी, ताक, ओ.आर.एस पाण्याचे द्रावण किंवा लस्सी, निंबुपाणी, आंबा, पन्हे इत्यादी पेय घ्या.

**उष्माघातापासुन बचावासाठी काय करू नये**

रिक्याम्या पोटी घराबाहेर पड्डु नका, उन्हात अधिकवेळ राहु नका, तिखट, मसालेदार आणि शिळे अन्न खाऊ नका, नेहमी पाणी सोबत ठेवा, शरिरात पाण्याची कमतरता कमी पड्डु देवु नका. उष्णतेचा त्रास झालेल्या व्यक्तीची मदत करत असतांना या गोष्टीचा अवलंब करावा. संबंधित व्यक्तीला थंड ठिकाणी तातडीने हलवावे. शरिराच्या जास्तीत जास्त भागांवर किंवा कपड्यावर थंड पाण्याचा मारा करावा. शक्य असेल तेव्हढा वेळ त्या व्यक्तीला वारा घालावा. शरिराचे तापमान वाढलेले, बेशुद्ध, गोंधळलेली, घाम येणे, थांबलेली अशी आपल्या नजरेस आल्यास टोल क्रमांक १०८ किंवा १०२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

उष्माघात ही गंभीर स्थिती असून वेळीच उपचार न केल्यास जीवघेणा ठरू शकतो. त्याची लक्षणे ओळखून तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. गरम वातावरणात स्वतःची काळजी घेणे आणि इतरांनाही सावध करणे गरजेचे आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांनी तीव्र उन्हात फिरु नये, आरोग्याची काळजी घ्यावी. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी वरील सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे.

**: संकलन :**
**श्री. सतिश आनंदराव बगमारे,**
**माहिती सहायक,**
**जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर; पुरवठा विभागाची कारवाई



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** हातकणंगले तालुक्यातील अतिग्रे परिसरात घरगुती गॅस टंचाई असताना काही व्यावसायिकांनी शासनाचे नियम मोडले. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी पुरवठा विभागाला धाडी टाकण्याचे आदेश दिले.

त्यानुसार पुरवठा अधिकारी दिनेश आडे यांच्या पथकाने रुकडी फाट्यावरील बिकानेर बेकरीतून ३ आणि घोडावत विद्यापीठा शेजारील हॉटेल राज प्युअर व्हेजमधून २ घरगुती गॅस सिलेंडर जप्त केले. या कारवाईमुळे परिसरातील टपरीधारकांमध्ये धूम उडाली.

आता प्रशासनाकडून टेहाळणी पथके कार्यरत असून यापुढे कडक कारवाई केली जाणार आहे. नागरिकांनी अशा बाबतची माहिती पुरवठा विभागाकडे द्यावी, असे आवाहन दिनेश आडे यांनी केले.

# मोठा खुलासा! इस्त्रायली हल्ल्यात इराणच्या दुसऱ्या सर्वोच्च नेत्याचा मृत्यू; मुलगाही ठार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** पश्चिम आशियातील युद्धाला १९ दिवस पूर्ण झाले असून परिस्थिती अधिकच तणावाची बनली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध थांबवण्याऐवजी लष्करी मोहीम सुरूच ठेवण्याचे संकेत दिले आहेत. यातच इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांचा इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात मृत्यू झाल्याची इराणकडून कबुली देण्यात आली आहे. लारीजानी हे आपल्या मुलीच्या घरी होते. तेव्हा त्यांच्यावर हवाई हल्ला झाला आहे. लारीजानी यांचा मुलगाही यात ठार झाला आहे.

माहितीनुसार, हल्ल्याच्या वेळी लारीजानी यांच्या मुली घराच्या दुसऱ्या भागात होत्या, ज्यामुळे त्या थोडक्यात बचावल्या. मात्र, आपल्या डोळ्यादेखत वडील आणि भावाचा मृत्यू झाल्याने त्या मोठा धक्क्यामध्ये आहेत. अली लारीजानी यांचा मुलगा वडिलांसोबतच महत्त्वाच्या चर्चेत होता, त्यावेळी झालेल्या स्फोटात त्याचाही मृत्यू झाला. इस्रायलने हा हल्ला इतक्या अचूकपणे केला की, केवळ लारीजानी यांचे सुरक्षित ठिकाण उद्ध्वस्त झाले, ज्यामुळे आजूबाजूच्या नागरी वस्तीचे नुकसान टाळले गेले, असे तज्ज्ञांचे म्हणणे



आहे.

जनरल गुलाम रझा सोलेमनी यांचाही मृत्यू

माहितीनुसार, इस्रायलने मंगळवारी रात्री केलेल्या हवाई हल्ल्यात दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याचा दावा केला होता. सुरुवातीला हा दावा फेटाळल्यानंतर आता इराणने लारिजानी यांच्यासह जनरल गुलाम रझा सोलेमनी यांचाही मृत्यू झाल्याच्या वृत्ताला इराणने दुजोरा दिला आहे. जनरल गुलाम रझा अतिशय शक्तिशाली लष्करी अधिकारी म्हणून ओळखले जात होते, गेल्या सहा वर्षापासून ते रिव्होल्यूशनरी गार्डचे बसिज गटाचे कमांडर होते. देश युद्धाच्या संकटात अराताना अयातुल्ला यांच्या मृत्यूनंतर इराणसाठी हा दुसरा सर्वात मोठा झटका मानला जात आहे. इस्रायलने दोन सुरक्षा अधिकाऱ्यांना ठार केल्यानंतर नवनियुक्त सर्वोच्च नेते मोजतावा खामेनी यांना शोधून ठार करणार, अशी धमकी दिली आहे.

# महाराष्ट्र शासनाचे १० वर्षे व २६ वर्षे मुदतीचे एक हजार कोटी रुपयांचे तर, २१ वर्षे मुदतीचे ५३० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

महाराष्ट्र शासनाचे १० वर्षे मुदतीचे एक हजार कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या १० वर्षे मुदतीच्या एक हजार कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. राज्य शासनास पाचशे कोटी रु.पर्यंत अतिरिक्त रक्कम उभारण्याचा पर्याय उपलब्ध असेल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादिपर्यंत वाटप करण्यात येईल.

२४ मार्च २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ मार्च २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २५ मार्च २०२६ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.



कर्जरोख्याचा कालावधी १० वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी २५ मार्च २०२६ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक २५ मार्च २०३६ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरील दरसाल दर शेकडा कूपन दराएवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी २५ सप्टेंबर आणि २५मार्च रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (एसएलआर) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे २६ वर्षे मुदतीचे एक हजार कोटी रुपयांचे रोखे विक्रीस**

महाराष्ट्र शासनाच्या २६ वर्षे मुदतीच्या एक हजार कोटींच्या (७.६६ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे २०५२) च्या (४ मार्च २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. राज्य शासनास पाचशे कोटी रु.पर्यंत अतिरिक्त रक्कम उभारण्याचा पर्याय उपलब्ध असेल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादिपर्यंत वाटप करण्यात येईल.

२४ मार्च २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ मार्च २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २५ मार्च २०२६ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील. कर्जरोख्याचा कालावधी २६ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ४ मार्च २०२६ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ४ मार्च २०५२ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा ७. ६६ टक्के दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी ४सप्टेंबर आणि ४मार्च रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (एसएलआर) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे २१ वर्षे मुदतीचे ५३० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस**

महाराष्ट्र शासनाच्या २१ वर्षे मुदतीच्या ५३० कोटींच्या (७.६६ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे ,२०४७) च्या (दि.४ मार्च २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादिपर्यंत वाटप करण्यात येईल.

२४ मार्च २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २४ मार्च २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २५ मार्च २०२६ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी २१ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ४ मार्च २०२६ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ४ मार्च २०४७ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा ७. ६६ टक्के दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी ४ सप्टेंबर आणि ४मार्च रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (एसएलआर) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.


## शब्दकोडे क्र. 84

आडवे शब्द

१. प्रवासात उपयोगी ३. पाण्याचा साठा, तळे ७. बळजबरीचा मुक्काम ११. पाहून पाहून वाईटाचीही सवय होणे १२. धातूचा नाजूक तंतू १३. लाकडाची उत्कृष्ट जात १४. समुदाय, गट १६. एक नैसर्गिक शीतपेय १७. थडगे १८. मृत्यू नसलेला १९. मान, प्रतिष्ठा, बूज २०. सुकुमार २१. चंदन उगाळण्याचा दगड २४. मधली खोली २६. गावातील देवाचा उरुस २७. 'एनओसी' मराठीत ३१. पुढारी ३२. लढाई, चकमक ३३. जागृत, चकमक ३३. जागृत, स्थान ३५. हुशार, चलाख ३७. श्रेष्ठ पुरुष ३९. सुतळीचे कापड ४२. तिंबा! ४४. पुत्र, मुलगा ४६. फसविणे ४८. कान व डोळे ताठ करणे ५०. सैन्याचा मालपुरवठा ५२. वजा ५३. सरस्वतीचे एक नाव ५६. माराची खूण ५७. क्षण (हिंदी) ५८. ओलसर हवा ६०. पुन्हा पुन्हा ६३. ऱ्हस्व असल्यास व्याधी ६४. पुंकेसर ६५. मत्स्य ६७. बोलणे ६९. मुलगा ७०. टाळ्यांचा जोरदार आवाज ७१. अगम्य ७३. खटला ७५. स्तुती करणारा ७६. अस्वल ७७. जन्म, मृत्यू ७८. तटबंदी

उभे शब्द

१. चाहता २. यामुळे रामायण घडले ३. जन्मदात्री ४. नेहमी बुजणारा ५. बाण ६. मृत्यूनंतरचे मुक्कामाचे स्थान ७. ठाण्याचा रहिवासी ८. वाघाची मावशी ९. भीती, भय १०. अजित नावाच्या भारतीय गोलंदाजाचे आडनाव १३. सामोपचार १५. भाताला दिलेला आकार १८. धाकटा भाऊ २०. हुक्की, लहर २१. च्या बरोबर २२. जय-पराजय २३. कर्ज, उपकार २४. फक्त, केवळ २५. जाते फिरतानाचा आवाज २६. जन्मापासून २७. ख्रिसमस २८. शिव्याशाप २९. हत्तीचा शिक्षक ३०. वारा ३२. वर्ष ३४. थंडीने गार पडणे ३६. दारूचा एक प्रकार ३८. आवाज, गोंगाट ४०. रोखलेली नजर ४१. एक जंगली फूल ४३. वरपांगी ४५. सोसाट्याचा वारा ४७. अवाढव्य, भव्य ४९. उणे ५१. नवऱ्याची दुसरी पत्नी ५२. संयम सुटलेला, अधीर ५४. बरणीला लावण्याचे फडके ५५. विहीर, --नलिका ५७. मान्यतापत्र ५९. नंतर ६०. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना ६१. थेट, सरळ ६२. धोबी ६५. हा जनात सांगावा, विरूद्ध असल्यास मनातच ठेवावा असे म्हणतात ६६. बडबड ६८. नोकरी ७१. शर्त, पण ७२. फोडातील द्रव ७४. डावा



### शब्दकोडे क्र. 83 चे उत्तर

आडवे उत्तर

१.विदूषक ३.बातमीदार ७.पोचपावती ९.बोबडा १०.वेगवान १२.ललकारी १४.यंदा १५.चाकरचुकर १८.रतन २१.रटाळ २३.मकड २५.सरहद २९.अवसर ३१.हरामखोर ३२.कसाई ३३.पालव ३४.टपणे ३६.सटरफटर ३९.नवलाई ४२.बाबा ४४.शकट ४६.टकटक ४८.चराचर ५०.फणकारा ५२.कणेर ५३.कटोरा ५४.रक्तदान ५७अ.कसेल त्याची जमीन ६१.तडकाफडकी ६४.सम ६६.लट ६८.पदोपदी ६९.जनार्दन ७१.वाकडसर ७३.मोती ७४.कपटी ७५.गर्द ७६.रत

उभे उत्तर

१.विद्यालय २.षटकार ३.बाबत ४.तडा ५.दावेदार ६.रग ७.जनक ८.पाल चुकचुकणे ११.वाचाळ १३.रीतसर १६.रमा १७.कड १९.नर २०.खोट्या नाण्याचा आवाज २२.टालमटोला २४.घाव २६.हद्दपार २७.खारट २८.साईबाबा २९.अवस ३०.समीर ३१.हवन ३५.पलटण ३७.टरकणे ३८.फरक ४०.वनचर ४१.ईश ४२.बावरा ४३.कचरा ४५.कफन ४६.टक ४७.टरफल ४९.रक्तपात ५१.काडीमोड ५३.कपची ५५.खट ५७.काकी ५८.सेनापती ५९.त्यागपत्र ६०.जड ६२.कालवा ६३.फटकळ ६५.मर्द ६७.भारत ६९.जप ७०.नग ७२.सर

## वृत्तविशेष...

### डिजिटल पीक पाहणी नोंदणीसाठी मुदतवाढ; शेतकऱ्यांना दिलासा रब्बी हंगाम २०२५-२६ साठी DCS ॲपद्वारे नोंदणी आता ३१ मार्चपर्यंत

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या वतीने डिजिटल पीक पाहणी (Digital Crop Survey - DCS) संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. रब्बी हंगाम २०२५-२६ साठी मोबाईल ॲपच्या माध्यमातून सुरू असलेली पीक नोंदणी प्रक्रिया आता ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. याआधी ही नोंदणी प्रक्रिया १५ जानेवारी २०२६ पर्यंत सुरू होती. त्यानंतर सहाय्यक स्तरावर नोंदणीस सुरुवात करण्यात आली होती व त्याची अंतिम मुदत १८ मार्च २०२६ निश्र्चित करण्यात आली होती. मात्र अद्यापही अनेक शेतकऱ्यांची पीक नोंदणी पूर्ण झालेली नसल्याचे लक्षात घेता शासनाने ही मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सद्यस्थितीत राज्यात सुमारे ५५.६९ टक्के क्षेत्राची पीक नोंदणी पूर्ण झाली आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पीक नोंदणी न झाल्यास नैसर्गिक आपत्ती, पीक विमा व इतर शासकीय लाभांपासून वंचित राहण्याची शक्यता असल्याने ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच शेतकऱ्यांनी ही नोंदणी शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश शासनाकडून देण्यात आले आहेत.

### दिल्लीतील पालम मेट्रो स्टेशन परिसरात भीषण आग, ३ चिमुकल्यांसह ७ जणांचा जळून मृत्यू

नवी दिल्ली: राजधानी नवी दिल्ली मध्ये बुधवारी, १८ मार्च रोजी सकाळी पालम मेट्रो स्टेशन जवळील सदनगर परिसरातील एका इमारतीला भीषण आग लागून ७ जणांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. ही आग सकाळी सुमारे ६:३० वाजता लागली.

माध्यमांवरून मिळालेल्या माहितीनुसार, इमारतीच्या खालच्या मजल्यावर कपडे आणि कॉस्मेटिक्सची दुकाने होती, तर वरच्या मजल्यावर एकाच कुटुंबातील ९ ते १५ सदस्य राहत होते. आगीमध्ये ७ जण जिवंत जळून मृत्यूमुखी पडले असून, त्यात ३ लहान मुलींचा समावेश आहे.

दरम्यान, प्राथमिक तपासात शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आग इतकी भीषण होती की अनेक जण अडकले होते. काहींनी जीव वाचवण्यासाठी इमारतीवरून उडी मारल्याची माहिती समोर येत आहे. तर काहींना भिंत तोडून बाहेर काढण्यात आले. घटनेची माहिती मिळताच सुमारे ३० अग्निशमन वाहने घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन दलाने भिंती तोडून अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

या दुर्घटनेत ४ जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, दिल्लीचे उपराज्यपाल तारनजित सिंह संधू यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आणि तातडीने मदतकार्य करण्याचे आदेश दिले आहेत. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### सौदी अरेबियाकडून भारताला रेड सी मार्गे कच्च्या तेलाचा पुरवठा सुरू

नवी दिल्ली : अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे स्ट्रेट ऑफ होर्मुज परिसरातील संकट अधिक गडद होत आहे. दरम्यान, भारतासाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. सौदी अरेबियाने आता रेड सी मार्गे भारताला कच्च्या तेलाचा पुरवठा सुरू केला आहे. सौदी अरेबियातील यानबू बंदर येथून अनेक तेलवाहू टँकर भारताच्या दिशेने रवाना झाले आहेत. होर्मुज मार्गाने जहाजांची वाहतूक धोकादायक बनलेल्या परिस्थितीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

अहवालानुसार, सध्या चार मोठे टँकर भारताकडे येत असून त्यामध्ये सुमारे ६० लाख बॅरल कच्चे तेल आहे. महिन्याच्या अखेरीपर्यंत अतिरिक्त ९० लाख ते १ कोटी बॅरल तेल भारतात पोहोचण्याची अपेक्षा आहे. सामान्यत: जगातील एकूण तेल व्यापारापैकी सुमारे २० टक्के तेल वाहतूक स्ट्रेट ऑफ होर्मुजमार्गे होते. भारतही खाडी देशांकडून मोठ्या प्रमाणात तेल याच मार्गाने आयात करतो. मात्र, इराणकडून जहाजांवर झालेल्या हल्ल्यांमुळे हा मार्ग असुरक्षित झाला आहे. त्यामुळे सौदी अरेबियाने पर्यायी मार्गाचा अवलंब केला आहे.

तेल प्रथम सुमारे १,२०० किलोमीटर लांबीच्या पाइपलाइनद्वारे यानबूपर्यंत आणले जाते आणि त्यानंतर तेथून टँकरद्वारे भारताकडे पाठवले जाते. मात्र, या नव्या मार्गालाही काही मर्यादा आहेत. पाइपलाइनची क्षमता मर्यादित असल्यामुळे होर्मुज मार्गाइतका तेलपुरवठा करणे शक्य नाही.

इराणमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर स्ट्रेट ऑफ होर्मुज व्यतिरिक्त बाब-अल-मंदेब सामुद्रधुनीजवळ देखील धोका कायम आहे. येथे हूती बंडखोरांनी यापूर्वी जहाजांवर हल्ले केले आहेत. त्यामुळे रेड सी मार्गही पूर्णपणे सुरक्षित म ानला जात नाही. तरीही सध्याच्या परिस्थितीत हा निर्णय भारतासाठी दिलासादायक ठरत आहे, कारण त्यामुळे तेलपुरवठा सुरू राहून संभाव्य ऊर्जा संकट कमी होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, मंगळवार (१७ मार्च २०२६) रोजी अमेरिकेने स्ट्रेट ऑफ होर्मुज परिसरात इराणच्या अँटी-शिप क्षेपणास्त्र तळांवर बॉम्बहल्ला केला आहे. या कारवाईद्वारे स्ट्रेट ऑफ होर्मुजवरील इराणचे नियंत्रण कमी करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

# CRF अंतर्गत जिल्ह्यात रस्ते निर्मितीसाठी निधी द्या

## केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात CRF अंतर्गत रस्ते मार्ग निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी आज केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली आहे.

रस्ते हे देशाच्या प्रगतीचे मुख्य महामार्ग असून ते आर्थिक विकास, दळणवळण आणि सामाजिक एकत्रीकरणाचा कणा आहे.आधुनिक व सुसज्ज रस्ते कृषी, उद्योग आणि व्यापाराला गती देऊन ग्रामीण भागाला शहरांशी जोडून रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचं काम करतात केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या मंत्रालयाच्यावतीने बुलढाणा लोकसभा मतदारसंघात केंद्र सरकारच्या वतीने महामार्गांची निर्मिती झाली परंतु अजूनही काही महामार्गांची निर्मिती उठऋ अंतर्गत झाल्यास जिल्ह्यात दळणवळणाची सुविधा नागरिकांना निर्माण होईल.

या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या महामार्गांना निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची आज १८ मार्च रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केली आहे. सोबतच जिल्ह्यातील नांदुरा येथील रेल्वे क्रॉसिंगवर ब्रिज नसल्याने या रस्त्यावरून जळगाव जामोद संग्रामपूर या आदिवासीक्षेत्र भागाकडे जाणाऱ्या वाहतुकीला नांदुरा येथे रेल्वे क्रॉस होईपर्यंत थांबावे लागते या क्रॉसिंगवर ब्रिज किंवा अंडरपास निर्माण व्हावा, अशी नागरिकांची इच्छा आहे. जनभावनेचा विचार करता या कामाला गती द्यावी अशी मागणी ही केंद्रीय आयुष्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या भेटीदरम्यान केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.



जिल्ह्यातील विकासात्मक रस्ते मार्गासाठी सहकार्य करण्याचा आश्वासन यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी नामदार प्रतापराव जाधव यांना दिले आहे.

### मालाड पूर्व मधील पीएपी प्रकल्पाच्या अनियमिततेबाबत चौकशी करणार - राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**मुंबई/प्रतिनिधी :** मालाड पूर्वमधील पीएपी प्रकल्पाच्या अनियमिततेबाबत अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी केली जाईल आणि चौकशीचा अहवाल आल्यानंतरच या प्रकल्पाचे काम सुरू केले जाईल असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत सांगितले. मालाड पूर्व मधील पीएपी प्रकल्पाबाबत जागेसंबंधी विधानसभा सदस्य अस्लम शेख यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या की, मालाड (पूर्व) येथील प्रकल्पग्रस्तांच्या () पुनर्वसन प्रकल्पासाठी महापालिकेने ४७० कोटी रुपयांचे क्रेडिट नोट आणि १००टक्के टीडीआर देऊनही संबंधित विकासकाने अद्याप बांधकामाचा कोणताही प्लॅन सादर केलेला नाही याची सखोल चौकशी करण्यात येईल.

## मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत खेळाडू निवड चाचणी ५ एप्रिलला

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मिशन लक्ष्यवेध योजना अंतर्गत जिल्हास्तर क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही चाचणी दि. ५ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे होणार आहे.

या योजनेअंतर्गत बुलढाणा येथे वेटलिफ्टिंग व मैदानी (ॲथलेटिक्स) या क्रीडा प्रकारांसाठी निवासी स्वरूपाचे क्रीडा निपुणता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, अल्पोहार तसेच क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून दिले जाणार आहे. जिल्ह्यातील पात्र व गुणवंत खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे. इच्छुक खेळाडूंनी दि. १ एप्रिल २०२६ सायंकाळी ६ वाजेपर्यंत निर्धारित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा.

निवड निकष : खेडाळू हा ३१ डिसेंबरपर्यंत २१ वर्षांखालील मुलगे/मुली, महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक, राज्यस्तरीय पदक विजेते किंवा राष्ट्रीय स्तरावर सहभागी (SGFI, WFI, Khelo India) खेळाडू गत २ वर्षांच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक व शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य राहिल. आवश्यक कागदपत्रे: जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र, ३ फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र, पालक संमतीपत्र इत्यादी.

अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांचा तपशील https://forms.gle/LrdFvr69gSqjQQR9 या लिंक मध्ये उपलब्ध असून इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा ४४३००१ येथे सादर करावा. तसेच अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. निवड प्रक्रिया शासनाने निश्र्चित केलेल्या निकषांनुसार तज्ज्ञ समितीद्वारे करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाव्दारे जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी दिली.

## 'तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल' कॉफीटेबल बुकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन




**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल' कॉफीटेबल बुकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वर्षा निवासस्थानी आज प्रकाशन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिका अरुणा ढेरे, ज्येष्ठ गायिका पद्मश्री डॉ.अश्विनी भिडे-देशपांडे, कॉफीटेबल बुकचे निर्माते विनोद पवार, माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे तसेच शिष्टमंडळातील सदस्य उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अतिशय सुंदर अशा कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करता आले याबद्दल अतिशय आनंद आहे. महाराष्ट्राचे प्रतिबिंब हे आपल्याला आपल्या वारीमध्ये दिसते, ते पंढरपुरात दिसते, ते विठ्ठलाच्या आराधनेत आपल्याला पाहायला मिळते. इतक्या वेगवेगळ्या कथा, प्रत्येक वारीमध्ये तयार होतात. ते सर्व कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून आपल्याला अनुभवता येणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, तीर्थ आणि त्या तीर्थातला जो देव आहे, हे दोन्ही महत्त्वाचे आहेत. त्याची माहिती, इतिहास किंवा त्यातल्या प्रमुख गोष्टी या कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून मिळाले. माहिती आणि छायाचित्रे यामुळे हे कॉफी टेबल बुक संग्रहणीय झाले आहे. आपली सांस्कृतिक माहिती जर कोणाला द्यायची असेल, तर काय द्यावे तर यामध्ये या पुस्तकाचा समावेश झाला आहे. इन्टॅन्जिबल हेरिटेजमध्ये युनेस्कोला आता ही पंढरीची वारी सादर करण्यात येईल, यासाठी हे कॉफी टेबल बुक महत्त्वाचे ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ग्रेस व आरती प्रभू यांच्या काव्याला अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने मराठी साहित्यातील अभिजात आणि भावसंपन्न काव्यपरंपरेला अभिवादन करण्यासाठी कवी ग्रेस आणि कवी आरती प्रभू यांच्या काव्यगीतांवर आधारित ''मंतरलेल्या शब्दबनात जेव्हा कवितांची गाणी होतात'' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी कवितेतील संवेदनशीलता, शब्दांची लय, आशयाची गूढता आणि संगीताची माधुर्यपूर्ण अभिव्यक्ती यांचा संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम रसिकांसाठी एक संस्मरणीय सांस्कृतिक अनुभव ठरणार आहे.

मराठी साहित्यात कवी ग्रेस (माणिक गोडघाटे) आणि कवी आरती प्रभू (शंकर वैद्य) यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि भावस्पर्शी लेखनातून आधुनिक मराठी कवितेला एक वेगळी दिशा दिली. त्यांच्या कवितांमध्ये मानवी मनातील सूक्ष्म भावना, एकाकीपणाची जाणीव, निसर्गाचे सौंदर्य, प्रेम, विरह, जीवनातील तत्त्वचिंतन आणि अस्तित्वाचा शोध या विषयांना अत्यंत प्रभावी शब्दरूप मिळाले. त्यांच्या अनेक कवितांना संगीताची जोड लाभल्यामुळे त्या काव्यगीतांच्या रूपात लोकप्रिय झाल्या असून मराठी रसिकांच्या मनात त्यांना विशेष स्थान प्राप्त झाले आहे. या समृद्ध साहित्यिक वारशाला अभिवादन करण्याच्या उद्देशाने हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता, मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात कवी ग्रेस आणि आरती प्रभू यांच्या निवडक कवितांवर आधारित काव्यगीतांचे सादरीकरण सुप्रसिद्ध गायकांच्या आवाजात सादर करण्यात येणार आहे.या कार्यक्रमात नचिकेत देसाई, धनश्री देशपांडे आणि विद्या करलगिकर हे गायक काव्यगीतांचे सादरीकरण करणार असून कार्यक्रमाचे संगीत संयोजन प्रशांत लळित यांनी केले आहे. काव्यवाचन, गीतसादरीकरण आणि संगीताची सुरेल मांडणी यामुळे कार्यक्रम अधिक प्रभावी व रसिकांना भावणारा ठरणार आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. राज्यातील साहित्य, कला आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन व संवर्धन करणे, तसेच नव्या पिढीपर्यंत मराठी साहित्याचा समृद्ध वारसा पोहोचविणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

# रेल्वे स्टेशन गेटजवळ बेकायदेशीर पुतळा उभारणी

## १० जणांवर भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**खामगाव/प्रतिनिधी :** खामगाव शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात मध्यरात्री गुपचूप अतिक्रमण करून पुतळा उभारण्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी १० जणांसह इतरांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पहाटेपर्यंत सुरू असलेल्या या हालचालींमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १७ मार्च रोजी रात्री



२ ते २.३० वाजताच्या दरम्यान नगर परिषद टर्निंग, रेल्वे स्टेशन गेटजवळील राष्ट्रीय महामार्ग उपविभागाच्या जागेवर काही जणांनी नियोजनबद्ध पद्धतीने अतिक्रमण केले. लोखंडी पाईप उभारून त्यावर अर्धाकृती पुतळा बसविण्यात आला. ही कारवाई पूर्णपणे विनापरवानगी करण्यात आल्याचे समोर आले आहे.या प्रकरणी नगर पालिका अतिक्रमण निर्मूलन विभागाचे प्रमुख आनंदमोहन रामलाल अहिर (रा. सतीफैल, खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून कृष्णा सुभाष नाटेकर, सनी सुरेश बोरकर, रुपेश अवचार, करण सकळकळे, कृष्णा वासुदेव बोदडे, नामदेव बाभुळकर, चेतन इंगळे, आशु खंडारे, लखन नाटेकर, कृष्णा कांबळे व इतरांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, संबंधितांनी कोणतीही अधिकृत परवानगी न घेता सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करून पुतळा उभारला. या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप केला. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १८९(२)(३), २२३, ३(५) तसेच महाराष्ट्र नगर परिषद, पंचायत व औद्योगिक नगर अधिनियम १९६५ मधील कलम १७९ आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोहेकाँ रामेश्वर फासे करत असून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. संबंधित आरोपींच्या भूमिकेचा तपास सुरू असून या मागील नेमका हेतू काय, याचाही शोध पोलीस घेत आहेत.